**Shikshan Sanshodhan** : Journal of Arts, Humanities and Social Sciences
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal
Volume - 9, Issue - 4, April - 2026
ISSN(o): 2581-6241
Impact Factor: 9.134

DOIs:10.2018/SS/202604006 --:-- Research Paper / Article / Review

# जीन जॅक रुसो यांचा सामाजिक कराराचा सिद्धांत आणि लोकशाहीची संकल्पना

[1] **प्रा. लवकुमार चिमनसिंग हारामी**
[2] **प्रा. राजेश मधुकर सोनकुसरे**
[1] सहाय्यक प्राध्यापक (राज्यशास्त्र) आर्टस् ॲण्ड कॉमर्स नाईट कॉलेज, नागपुर
[2] शोधार्थी
[2] Email Id: rmsonkusare99@gmail.com

**सारांशः** आधुनिक राजकीय विचारसरणीच्या विकासामध्ये जीन जॅक रुसो यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. रूसो यांनी व्यक्तीस्वातंत्र्य, समानता आणि लोकसत्तेच्या संकल्पनांना तात्त्विक आधार दिला. रुसो यांचा सामाजिक करार हा ग्रंथ 1762 मध्ये प्रकाशित झाला आणि आधुनिक लोकशाहीच्या तत्त्वज्ञानाला एक नवे वळण मिळाले. त्यांनी मांडलेला सामाजिक करार सिद्धांत हा आधुनिक लोकशाहीच्या पायाभरणीचा एक महत्त्वपूर्ण आधार मानला जातो. रुसो यांच्या मते राज्याची निर्मिती ही लोकांच्या परस्पर करारातून निर्माण झाली असून राजसत्ता ही जनतेकडूनच उद्भवते, म्हणूण शासन व्यवस्था ही लोकांच्या इच्छेवर आधारित असायला पाहिजे, अशी त्यांची ठाम भूमिका होती.

रुसो यांच्या मते राज्य आणि समाज यांचा उगम लोकांच्या सामूहिक करारातून झाला आहे. व्यक्तीने आपल्या नैसर्गिक स्वातंत्र्याचा काही भाग समाजाच्या हिताकरिता सोडून दिला आणि त्यातून राज्यव्यवस्था निर्माण झाली. या कराराचा मुख्य उद्देश सर्वांच्या हिताचे संरक्षण करणे आहे.

लोकशाही ही अशी शासनपद्धती आहे ज्यामध्ये अंतिम सत्ता जनतेच्या हातात असते. रुसो यांच्या सामाजिक करार सिद्धांतामुळे लोकसत्तेची कल्पना अधिक स्पष्ट झाली आणि आधुनिक लोकशाहीच्या विकासाला बळ मिळाले. या शोधनिबंधामध्ये रुसो यांच्या सामाजिक करार सिद्धांताचे स्वरूप, त्यातील प्रमुख तत्त्वे आणि त्याचा लोकशाहीवर झालेला प्रभाव यांचा अभ्यास केला आहे.

**मुख्य शब्दः** जीन जॅक रुसो, सामाजिक करार, लोकशाही, व्यक्तीस्वातंत्र्य, समानता.

## 1. प्रस्तावणाः

माणूस जन्मतः स्वतंत्र आहे, परंतु तो सर्वत्र साखळदंडांनी जखडलेला आहे, हे जगप्रसिद्ध विधान करणारा अठराव्या शतकातील थोर फ्रेंच विचारवंत म्हणजे जीन जॅक रुसो. रुसो हे एक तत्त्वज्ञ होते, शिवाय ते आधुनिक लोकशाहीचे आणि मानवी स्वातंत्र्याचे प्रणेते म्हणूण सुद्धा मानले जातात. त्यांच्या 'सामाजिक करार' या ग्रंथाने राजकीय विचारांच्या इतिहासात एक अभूतपूर्व क्रांती घडवून आणली. या ग्रंथातील विचारांनीच पुढे 1789 च्या फ्रेंच राज्यक्रांतीचा पाया रचला आणि जगाला स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही त्रिसूत्री दिली.

मध्ययुगीन काळात राजाला ईश्वराचा अंश किंवा ईश्वराचा अवतार मानले जात असे आणि त्याची सत्ता अनियंत्रित होती. अशा काळात रुसो यांनी सत्तेचा उगम राजाच्या दैवी अधिकारात नसून तो जनतेच्या संमतीत आहे, हा क्रांतिकारी विचार मांडला. रुसो यांच्या मते, मानवाची आदिम अवस्था ही अत्यंत सुखी आणि शांततापूर्ण होती, जिला त्यांनी 'उदात्त रानटी अवस्था' असेही म्हटले आहे. मात्र, संस्कृतीचा विकास, लोकसंख्या वाढ आणि विशेषतः खाजगी मालमत्ता या संकल्पनेच्या उदयामुळे मानवी जीवनात

विषमता, मत्सर आणि गुलामगिरी शिरली. या दुष्टचक्रातून मुक्त होण्यासाठी आणि आपले नैसर्गिक स्वातंत्र्य पुन्हा मिळवण्यासाठी मानवाने एकत्र येऊन जो करार केला, तोच 'सामाजिक करार' होय.


रुसो यांनी केवळ बहुमताच्या शासनाचा पुरस्कार केला नाही, तर ज्या शासनात प्रत्येक नागरिकाचा नैतिक सहभाग असेल, अशा प्रत्यक्ष लोकशाहीचे विचार मांडले. आज जेव्हा जगभरात लोकशाहीची मूल्ये आणि व्यक्तीस्वातंत्र्य यावर चर्चा होते, तेव्हा रुसो यांचे विचार अधिकच प्रस्तुत ठरतात.

## 2. जीवन परिचयः

जीन जॅक रुसो यांचा जन्म 28 जून 1712 रोजी स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. रुसोच्या जन्मानंतर काही दिवसांतच त्यांच्या आईचा मृत्यू झाला. त्यांचे वडील घड्याळजी होते. वडिलांसोबत झालेल्या वादानंतर वयाच्या 16 व्या वर्षी रुसो यांनी घर सोडले आणि युरोपभर भटकंती केली. त्यांनी आपल्या आयुष्यात संगीतकार, नक्कल करणारा, शिक्षक आणि सचिव अशा अनेक भूमिका निभावल्या. या संघर्षाच्या काळातच त्यांना समाजातील विषमता आणि अन्यायाचा जवळून अनुभव आला. 1750 मध्ये 'डिस्कोर्स ऑन द आर्ट्स अँड सायन्सेस' या निबंधासाठी त्यांना 'ॲकॅडमी ऑफ दिजोंचे पारितोषिक' मिळाले आणि ते प्रसिद्ध झाले. 2 जुलै 1778 रोजी फ्रान्समध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर 11 वर्षांनी झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीवर त्यांच्या विचारांचा प्रचंड प्रभाव होता.

### 2.1. रुसो यांच्या प्रमुख ग्रंथांमध्ये खालील ग्रंथांचा समावेश होतोः

- सामाजिक करार (1762): राजकीय विचारांचा पाया.
- एमिल (1762): शिक्षणशास्त्रावरील भाष्य.
- कॉन्फेसन्स: रुसो यांचे आत्मचरित्र, ज्यामध्ये त्यांनी आपल्या चुका आणि अनुभवांचे प्रांजळ वर्णन केले आहे.
- डिस्कोर्सेस ऑन इनइक्वॅलीटी (1755): विषमतेच्या उगमस्थानाचा शोध.




**I. जीन जॅक रुसो यांचे प्रसिध्द ग्रंथ सामाजिक करार आणि एमिल**

## 3. नैसर्गिक अवस्था आणि कराराची गरजः

रुसोने नैसर्गिक अवस्थेतील मानवाला उदात्त रानटी म्हटले आहे. माणूस सुरुवातीला आनंदी आणि स्वतंत्र होता, परंतु खाजगी मालमत्तेच्या कल्पनेमुळे समाजात विषमता आणि कलह निर्माण झाला. रुसोच्या मते मानवाची नैसर्गिक अवस्था शांततापूर्ण आणि स्वतंत्रपूर्ण होती. त्या अवस्थेत लोक साधे जीवन जगत होते आणि त्यांच्यात स्पर्धा किंवा लोभ नव्हता. परंतु धन किंवा संपत्तीची निर्मिती

झाल्यानंतर समाजात असमानता वाढली. संपत्तीमुळे शक्तिशाली लोकांनी दुर्बलांवर सत्ता गाजवायला सुरुवात केली. त्यामुळे सामाजिक संघर्ष वाढला आणि लोकांनी समाजात शिस्त आणि व्यवस्था निर्माण करण्यासाठी सामाजिक करार केला.

नैसर्गिक अवस्थेतील दोष दूर करण्यासाठी आणि मानवी जीवन सुसह्य करण्यासाठी 'सामाजिक करार' करण्याची गरज भासली. त्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेतः

- नैसर्गिक अवस्थेत कोणाच्याही जीविताची खात्री नव्हती. स्वतःच्या प्राणांचे रक्षण करण्यासाठी लोकांनी आपापसांत करार करून एका मध्यवर्ती सत्तेची (राज्य) निर्मिती केली.
- जेव्हा दोन व्यक्तींमध्ये वाद निर्माण होतो, तेव्हा त्याचा निवाडा करणारी तिसरी निष्पक्ष शक्ती हवी असते. नैसर्गिक अवस्थेत प्रत्येक जण स्वतःच न्यायाधीश होता, ज्यामुळे अराजकता निर्माण होत असे.
- आपल्या मालमत्तेचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी एका कायदेशीर चौकटीची गरज होती, जी केवळ कराराद्वारे शक्य होती.
- सततची भीती आणि संघर्षातून बाहेर पडून शांततामय सहजीवन जगण्यासाठी मानवाने आपले काही अधिकार स्वेच्छेने एका शासकाला किंवा समुदायाला अर्पण केले.
- रुसोच्या मते, वैयक्तिक स्वार्थापेक्षा 'सामूहिक इच्छा' किंवा 'लोकहित' जपण्यासाठी सामाजिक करार होणे आवश्यक होते, ज्यामुळे खऱ्या स्वातंत्र्याची प्राप्ती होऊ शकेल.

## 4. सामाजिक करार सिद्धांताची संकल्पना

सामाजिक करार सिद्धांतानुसार राज्याची उत्पत्ती ही लोकांच्या परस्पर करारामुळे झाली आहे. नैसर्गिक अवस्थेत लोक स्वतंत्र होते, परंतु सुरक्षिततेच्या अभावामुळे त्यांनी एकत्र येऊन करार केला आणि राज्याची निर्मिती केली.

रुसोच्या मते, सुरुवातीचा काळ हा उदात्त रानटीमाणसाचा होता. तो आनंदी आणि स्वावलंबी होता. पण लोकसंख्या वाढली आणि खाजगी मालमत्ता अस्तित्वात आली, तेव्हा विषमता, मत्सर आणि संघर्ष सुरू झाला. ही समस्या सोडवण्यासाठी मानवाने परस्परांशी करार केला यालाच सामाजिक करार म्हणतात. यातूनच मानवाने समाज आणि राज्य निर्माण केले. रुसोच्या मते हा करार असा असतो की प्रत्येक व्यक्ती स्वतःचे अधिकार संपूर्ण समाजाला देतो, आणि त्या बदल्यात समाज त्याला संरक्षण आणि स्वातंर्त्य प्रदान करतो. या करारामुळे "सामूहिक इच्छा" निर्माण होते.

## 5. इच्छा आणि इच्छेचे प्रकारः

इच्छा म्हणजे एखादी गोष्ट मिळवण्याची, साध्य करण्याची किंवा अनुभवण्याची मनातील आकांक्षा किंवा अभिलाषा होय. मनुष्याला एखादी वस्तू, सुख, ज्ञान किंवा उद्दिष्ट प्राप्त करण्याची जी अंतर्गत भावना किंवा प्रेरणा निर्माण होते, तिला इच्छा म्हणतात. साध्या शब्दात सांगायचे तर, एखाद्या गोष्टीची उणीव भासणे आणि ती पूर्ण करण्याची ओढ लागणे म्हणजे इच्छा. जीन-जॅक रुसो यांच्या 'सामाजिक करार' सिद्धांतात इच्छेचे अत्यंत महत्त्व आहे. रुसोने त्याच्या सामाजिक करार सिद्धांतात इच्छेचे दोन मुख्य प्रकार सांगितले आहेत, जे लोकशाही समजून घेण्यासाठी महत्त्वाचे आहेत, ते खालिल प्रमाणे आहे.

- **वैयक्तिक इच्छाः**

  ही प्रत्येक व्यक्तीची स्वार्थी किंवा खाजगी इच्छा असते. यात व्यक्ती केवळ स्वतःच्या फायद्याचा, गरजांचा आणि आनंदाचा विचार करते. ही इच्छा समाजाच्या हितापेक्षा स्वतःच्या हिताला प्राधान्य देते. उदाहरणः कर न भरण्याची इच्छा असणे कारण त्यामुळे स्वतःचे पैसे वाचतात, मग त्याचा समाजावर काहीही परिणाम होवो.

- **सामान्य इच्छा किंवा सामूहिक इच्छाः**

  सामान्य इच्छा म्हणजे समाजातील सर्व व्यक्तींच्या अशा इच्छांचा समूह जो सार्वजनिक कल्याणासाठी असतो. रुसोच्या सिद्धांतातील ही सर्वात महत्त्वाची संकल्पना आहे. ही इच्छा संपूर्ण समाजाच्या कल्याणासाठी असते. यात 'मी' पेक्षा 'आम्ही' आणि 'सार्वजनिक हित' याला महत्त्व दिले जाते. ही इच्छा न्याय्य, नैतिक आणि सर्वांना समान न्याय देणारी असते. ती केवळ बहुमताची इच्छा नसून 'उदात्त' इच्छा असते. उदाहरणः पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी प्रदूषणावर निर्बंध घालणे. यात काहींचे वैयक्तिक नुकसान होऊ शकते, पण ते सर्वांच्या भविष्यासाठी हिताचे असते.

### 6. सामाजिक कराराची रचनाः

रुसोच्या मते सामाजिक कराराचा मुख्य उद्देश म्हणजे व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि समाजाची सुरक्षा यामध्ये संतुलन निर्माण करणे. सामाजिक कराराची रचना ही नैसर्गिक मानव कडून 'राजकीय नागरिक' बनण्यापर्यंतचा प्रवास आहे. यामुळे समाजात एक शिस्तबद्ध व्यवस्था निर्माण होते, जिथे शक्तीपेक्षा कायद्याला अधिक महत्त्व दिले जाते. सामाजिक करार ही केवळ एक संकल्पना नसून ती राज्याच्या निर्मितीची एक पद्धतशीर प्रक्रिया किंवा रचना आहे. सामान्यतः सामाजिक कराराची रचना खालील टप्प्यांतून जाते.

- **कराराचे स्वरूप:** हा करार व्यक्ती - व्यक्तींमध्ये झालेला असतो. नैसर्गिक अवस्थेतील अराजकता किंवा असुरक्षितता संपवण्यासाठी सर्व व्यक्ती एकत्र येतात आणि एका करारावर स्वाक्षरी करतात (किंवा संमती देतात). रुसो यांच्या मते लोकांनी स्वतःचा स्वतःशीच करार केला, ज्याद्वारे त्यांनी आपली वैयक्तिक इच्छा त्यागून सामूहिक इच्छेला सर्वोच्च मानले.
- **अधिकार समर्पणः** कराराच्या रचनेचा मुख्य भाग म्हणजे अधिकारांचे हस्तांतरण. नैसर्गिक अवस्थेत माणसाला अमर्याद स्वातंत्र्य असते, पण ते सुरक्षित नसते. कराराद्वारे माणूस आपले काही अधिकार (उदा. स्वतःचा न्याय स्वतः करण्याचा अधिकार) त्यागून ते राज्याला किंवा समाजाला देतो. बदल्यात, राज्य त्याला सुरक्षा, कायदा आणि न्याय देण्याचे वचन देते.
- **सार्वभौम सत्तेची निर्मितीः** कराराच्या माध्यमातून एका सार्वभौम सत्तेचा जन्म होतो. ही सत्ता सर्वोच्च असते आणि तिचे नियम पाळणे सर्वांसाठी बंधनकारक असते.

### 6.1. सामाजिक कराराची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेतः

- **सार्वभौमत्व लोकांमध्ये असतेः** राज्याची सर्वोच्च सत्ता ही लोकांमध्ये असते. राजा किंवा शासक हा फक्त लोकांचा प्रतिनिधी असतो.
- **सामूहिक इच्छाः** समाजातील सर्व लोकांच्या सामूहिक हिताला सामूहिक इच्छा म्हणतात. हीच राज्याच्या कायद्याचा आधार असते.
- **कायद्याचे पालन सर्वांसाठी समानः** कायदे सर्व नागरिकांसाठी समान असतात.
- **स्वातंत्र्याचे संरक्षणः** सामाजिक करारामुळे व्यक्तीचे स्वातंत्र्य नष्ट होत नाही, उलट त्याचे संरक्षण होते.

### 7. लोकशाहीः

लोकशाही म्हणजे अशी शासनपद्धती ज्यामध्ये सत्ता जनतेच्या हातात असते आणि जनता प्रतिनिधी निवडून सरकार चालवते. "जनतेचे शासन, जनतेद्वारे आणि जनतेसाठी" ही लोकशाहीची मूलभूत संकल्पना मानली जाते. लोकशाही ही समानता, स्वातंत्र्य आणि न्याय या तत्त्वांवर आधारित शासनपद्धती आहे. यात जनतेच्या सहभागाला महत्त्व दिले जाते आणि सरकारचे उद्दिष्ट जनतेचे कल्याण करणे असते.

### 8. रुसोचे लोकशाही विषयक विचार किंवा रुसोची लोकशाहीची संकल्पनाः

रुसोचे विचार आधुनिक लोकशाहीच्या विकासात अत्यंत महत्त्वाचे ठरले. रुसो यांचं लोकशाहीविषयक विचार त्यांच्या द सोशल कॉन्ट्रॅक्ट या जगप्रसिद्ध ग्रंथात पाहायला मिळतात. रुसोची लोकशाही ही आजच्या प्रतिनिधिक लोकशाहीपेक्षा वेगळी आणि अधिक प्रत्यक्ष स्वरूपाची होती.
रुसोच्या लोकशाही विचारांचे प्रमुख पैलू खालीलप्रमाणे आहेतः

**8.1. लोकप्रिय सार्वभौमत्वः** रुसोच्या मते, सत्तेचा खरा उगम राजात किंवा संसदेत नसून 'जनतेमध्ये' असतो. राज्यकर्ते हे जनतेचे स्वामी नसून सेवक आहेत. जनतेने दिलेली सत्ता जनता कधीही काढून घेऊ शकते. कायदे बनवण्याचा अंतिम अधिकार फक्त जनतेलाच असावा, असे रुसो मानत.

**8.2. सामूहिक इच्छाः** रुसोच्या लोकशाहीचा प्राण म्हणजे 'सामूहिक इच्छा'. लोकशाही म्हणजे केवळ बहुमताचे शासन नाही, तर 'सर्वांच्या कल्याणाचा विचार' करणारी व्यवस्था होय. जेव्हा नागरिक आपल्या वैयक्तिक स्वार्थाचा त्याग करून समाजाच्या हिताचा विचार करतात, तेव्हा 'सामूहिक इच्छा' प्रकट होते. खऱ्या लोकशाहीत प्रत्येक कायदा हा या सामूहिक इच्छेचे प्रतिबिंब असावा.

**8.3. प्रत्यक्ष लोकशाही:** रुसो प्रतिनिधिक लोकशाहीचे कट्टर विरोधक होते. त्यांचे प्रसिद्ध वाक्य होते: "इंग्लंडमधील लोक स्वतःला स्वतंत्र समजतात, पण ते फक्त निवडणुकीच्या काळातच स्वतंत्र असतात; निवडणूक संपली की ते पुन्हा गुलाम होतात." ' त्यांच्या मते, स्वातंत्र्य हे दुसऱ्याला प्रतिनिधी म्हणून दिले जाऊ शकत नाही. लोकांनी स्वतः एकत्र येऊन कायदे केले पाहिजेत.

**8.4. स्वातंत्र्य आणि समानता:** रूसोसाठी लोकशाही म्हणजे केवळ मतदानाचा अधिकार नाही, तर ती स्वातंत्र्य आणि समानता टिकवणारी व्यवस्था आहे.

**स्वातंत्र्य:** कायद्याचे पालन करणे म्हणजे स्वतःला शिस्त लावणे होय. कारण लोकशाहीत कायदा जनतेनेच स्वतःसाठी बनवलेला असतो.

**समानता:** "कोणीही इतका श्रीमंत नसावा की तो दुसऱ्यला विकत घेऊ शकेल, आणि कोणीही इतका गरीब नसावा की त्याला स्वतःला विकावे लागेल." आर्थिक समानतेशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकत नाही, असा त्यांचा ठाम विश्वास होता.

## 9. रुसोच्या विचारांचा प्रभाव:

जीन-जॅक रुसो यांच्या विचारांनी केवळ अठराव्या शतकातील युरोपलाच नव्हे, तर आधुनिक जगातील राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक व्यवस्थेला मोठी कलाटणी दिली. त्यांच्या विचारांचा प्रभाव विवीध क्षेत्रांत दिसून येतो:

### 9.1. फ्रेंच राज्यक्रांती (1989):

रुसो यांना 'फ्रेंच राज्यक्रांतीचे आध्यात्मिक जनक' मानले जाते. त्यांच्या 'द सोशल कॉन्ट्रॅक्ट' मधील विचारांनी क्रांतीला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या क्रांतीच्या त्रिसूत्रीचा उगम रुसोच्या विचारांत होता. सत्तेचा अधिकार राजाला देवाने दिलेला नसून तो जनतेकडून येतो, या विचारामुळे फ्रेंच जनतेने राजेशाहीविरुद्ध बंड केले. 'मॅक्सिमिलियन रोबेस्पियर' सारखे क्रांतीचे नेते रुसोच्या 'सामूहिक इच्छा' या संकल्पनेने प्रभावित होते.

### 9.2. आधुनिक लोकशाही आणि राष्ट्रवाद:

रुसोच्या विचारांनी आधुनिक लोकशाहीची पायाभरणी केली. आजच्या काळात आपण ज्याला 'लोकशाही' म्हणतो, त्यातील "जनतेचे शासन" ही मूळ कल्पना रुसोची आहे. 'लोक' आणि 'राष्ट्र' एकच आहेत आणि त्यांनी स्वतःच्या हितासाठी एकत्र येणे आवश्यक आहे, या विचारातून आधुनिक राष्ट्रवादाची संकल्पना विकसित झाली.

### 9.3. भारतीय संविधानावर प्रभाव:

भारताच्या संविधानातील 'प्रस्तावना' मध्ये रुसोच्या विचारांची झलक दिसते. "आम्ही भारताचे लोक" ही सुरुवात रुसोच्या 'लोकप्रिय सार्वभौमत्व' संकल्पनेशी मिळतीजुळती आहे. न्याय, स्वातंत्र्य आणि समता या मूल्यांचा समावेश भारतीय संविधानात करताना फ्रेंच क्रांतीचा (आणि पर्यायाने रुसोचा) संदर्भ घेण्यात आला आहे.

### 9.4. शैक्षणिक क्षेत्रातील बदल:

रुसो यांनी त्यांच्या 'एमिल' या ग्रंथात शिक्षणाचे नवीन तत्त्वज्ञान मांडले. मुलांवर पुस्तकी ज्ञान लादण्यापेक्षा त्यांना निसर्गाच्या सानिध्यात, मुक्त वातावरणात शिकू दिले पाहिजे, हा विचार त्यांनी मांडला. आजच्या आधुनिक शिक्षण पद्धतीत 'विद्यार्थी' हा केंद्रबिंदू मानला जातो, ज्याची सुरुवात रुसोच्या विचारांतून झाली होती.

## 10. निष्कर्ष:

जीन-जॅक रुसो यांचा सामाजिक करार सिद्धांत आणि लोकशाहीची संकल्पना आधुनिक राजकीय तत्त्वज्ञानात अत्यंत महत्त्वाची मानली जाते. रुसो यांच्या मते राज्याची खरी सत्ता ही लोकांकडे असते आणि शासनाने लोकांच्या सामूहिक हितासाठी कार्य केले पाहिजे. त्यांनी मांडलेली सामान्य इच्छा ही संकल्पना समाजातील सर्वांच्या कल्याणाचा विचार करणारी आहे.

रुसो यांनी स्वातंत्र्य, समानता आणि लोकसत्ता या मूल्यांना विशेष महत्त्व दिले. त्यांच्या सामाजिक करार सिद्धांतामुळे लोकशाही व्यवस्थेला मजबूत तात्त्विक आधार मिळाला. या विचारांमुळे नागरिकांचा शासनातील सहभाग वाढवण्याची कल्पना विकसित झाली आणि लोकशाहीची संकल्पना अधिक स्पष्ट व प्रभावी झाली.

एकंदरीत, रुसो यांच्या सामाजिक करार सिद्धांतामुळे लोकशाहीच्या तत्त्वांना दिशा मिळाली आणि आधुनिक लोकशाही व्यवस्थेच्या विकासात त्यांच्या विचारांचा मोठा प्रभाव पडला. त्यामुळे रुसो यांना लोकशाही विचारांच्या विकासातील एक महत्त्वाचे विचारवंत मानले जाते.

**संदर्भ ग्रंथ सूचीः**

1. भालेराव, अ. (2015): राजकीय विचारवंत. *विद्या बुक्स पब्लिशर्स.*
2. गर्गे, स. मा. (1998): राजकीय विचारप्रवाह. *कॉन्टिनेंटल प्रकाशन.*
3. गौबा, ओ. पी. (2012): पाश्चिमात्य राजकीय विचार. *मॅकमिलन इंडिया.*
4. चौसाळकर, अ. (2007): पाश्चात्य राजकीय विचारवंत. *फडके प्रकाशन.*
5. पाटील, वा. भा. (2010): राजकीय तत्त्वज्ञान. *मंगेश प्रकाशन.*
6. Rousseau, J. J. (2002): The Social Contract (G. D. H. Cole, Trans.). *New York: Dover Publications.*